सुचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की खालील सूचनेचे अवलोकन करून त्याप्रमाणे आपली माहिती सादर करावयाची आहे पत्र क्रमांक निवडणूक 30 अकोला पश्चिम/म स / कावी 840/2026 दिनांक ०१/१०/२०२६ च्या प्राप्त पत्रानुसार विशेष सखोल पुन्हा निरीक्षण कार्यक्रम 2026 अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणी बाबतची सांख्यिकी माहिती सादर करावयाची आहे

१. मतदार यादीत नाव समाविष्ट असलेल्या आधीच नोंदणी झालेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या

२. मतदार यादीत समाविष्ट नसलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या

३ 30 अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात समाविष्ट नसलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या

४.यापैकी यापूर्वीचे विविध माध्यमातून फॉर्म क्रमांक सहा मार्फत मतदार नोंदणी अर्ज भरलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या

५. फॉर्म क्रमांक सहा भरण्यासाठी प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

०१/१०/२०२६

प्राचार्य
Principal
Shankarlal Khandelwal Arts,
Science & Commerce College,
AKOLA (M.S.)

महाराष्ट्र शासन

उपजिल्हाधिकारी महसूल तथा मतदार नोंदणी अधिकारी,
30-अकोला पश्चिम विधानसभा मतदार संघ

ई-मेल-dcrakola@rediffmail.com
दुरध्वनी क्रं.: 0724-2426214

क्र.निवडणूक/30-अकोला पश्चिम/म.स./कावि- 840/2026 दिनांक:- 01/10/2026

निवडणूक अत्यंत महत्त्वाचे

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालये,
अकोला.

विषय: विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-2026 अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणीबाबतची सांख्यिकीय माहिती सादर करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशानुसार सध्या विशेष सखोल पुनरीक्षण-2026 वेगाने सुरू आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश 18 वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक पात्र युवा नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे हा आहे.

तुमच्या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेले अनेक विद्यार्थी हे नवमतदार आहेत. या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि एकही पात्र विद्यार्थी मतदानापासून वंचित राहू नये यासाठी, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अचूक सांख्यिकीय माहिती या कार्यालयाला आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने, आपल्या महाविद्यालयातील मतदार व नवमतदार विद्यार्थ्यांची माहिती खालील विहित नमुन्यात सादर करावी.

विद्यार्थ्यांच्या मतदार माहितीचा तक्ता

अ.क्र.	माहितीचा तपशील	एकूण विद्यार्थी संख्या	शेरा
1	महाविद्यालयातील सध्या 18 वर्षे पूर्ण झालेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या (वय वर्ष 18)		
2	महाविद्यालयातील 18 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या (वय वर्ष 18+)		
3	वरीलपैकी मतदार यादीत नाव समाविष्ट असलेल्या (आधीच नोंदणी झालेल्या) एकूण विद्यार्थ्यांची संख्या		
4	वरीलपैकी मतदार यादी समाविष्ट नसलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या		
5	30-अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात समाविष्ट नसलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या		
6	यापैकी यापुर्वीचे विविध माध्यमांतून फॉर्म क्र. 6 मार्फत मतदार नोंदणी अर्ज भरलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या		
7	फॉर्म क्र. 6 भरण्यासाठी प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या		

आपल्या स्तरावरील पात्र विद्यार्थ्यांची माहिती भरून अहवाल सादर करावा.

(निखील खेमनर) 01.10
उपजिल्हाधिकारी (महसुल) तथा
मतदार नोंदणी अधिकारी,
30-अकोला पश्चिम वि.स.म.सं.

प्रतिलिपी:- 1. मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अकोला यांना माहितीस्तव सविनय सादर.